नाशिक, धुळे, नंदुरबार, पालघर, अहमदनगर, नांदेड, हिंगोली, मुंबई, ठाणे, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली सांगली, पुणे, छत्रपती संभाजीनगर, जळगाव या जिल्ह्यात एकाचवेळी प्रकाशित होणारे दैनिक वृत्तपत्र

२ रा वर्धापन दिन...

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com

पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!

2 वर्धापन दिन

मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE- 01 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Monday 28 April 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ०१ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ सोमवार दि.२८ एप्रिल २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये






















अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
**दैनिक स्वराज्यदूत**
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

संपादकीय

दैनिक स्वराज्यदूत

# आवाहन : आपल्या सहकार्यातून घडवूया नव्या महाराष्ट्राचे स्वप्न

प्रिय वाचकबंधूंनो,

आज आपल्या सर्वांच्या सहकार्याने, विश्वासाने आणि प्रेमाने आपल्या दैनिक स्वराज्यदूत या मराठी दैनिकाला दोन वर्षे पूर्ण होत आहेत. हा आपल्या सर्वांचा विजय आहे! ही केवळ आमच्या संपादकीय मंडळाची, लेखकांची वा प्रकाशकांची कामगिरी नाही; तर हा विजय आहे प्रत्येक त्या वाचकाचा, ज्यांनी या दोन वर्षांत आम्हाला साथ दिली, दिशा दिली आणि आमच्यावर आपली अपार माया दाखवली.

आज या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त, मी एक संपादक म्हणून तुम्हा सर्व वाचकांसमोर काही विचार मांडत आहे. हे केवळ आमचे मनोगत नाही, तर एक आर्त आवाहन आहे की आपण सर्व मिळून एका नव्या, उज्ज्वल महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी हातात हात घालून वाटचाल करू या.

**पत्रकारितेची जबाबदारी**

पत्रकारिता ही केवळ बातम्या देणारी संस्था नाही. ती समाजाचे भान जागृत करणारी एक शक्ती आहे. आपल्या दैनिकाने सुरुवातीपासूनच एक धोरण ठरवले "फक्त वाचकप्रिय नसावे, तर वाचकहिताय वर्तावे." त्या वचनाची आम्ही पावन निष्ठेने सेवा केली आहे. या प्रवासात आम्ही कधी लोकप्रियतेच्या मोहाला बळी पडलो नाही, तर सत्याच्या प्रकाशातच मार्गक्रमण केले.

मात्र, सत्य सांगणे, तटस्थपणे मते मांडणे आणि गरज पडल्यास अन्यायाच्या विरुद्ध आवाज उठवणे ही जबाबदारी केवळ आमचीच नाही. वाचक म्हणून, तुम्हीही या सत्ययात्रेतले साथीदार आहात. म्हणूनच, आज या वर्धापन दिनी मी तुम्हाला आवाहन करतो. या पत्रकारितेच्या पवित्र प्रवासात अधिक सक्रिय सहभागी व्हा.

**वाचकांची भूमिका**

समाज बदलायला हवा असेल तर विचार बदला लागतो. विचार बदलवायचा असेल तर वाचन, विचारमंथन आणि संवाद गरजेचा असतो. दैनिक स्वराज्यदूत हे केवळ बातम्यांचे दैनंदिन संकलन न राहता, वाचकांसाठी एक वैचारिक मंच व्हावे, अशी आमची इच्छा आहे. त्यामुळे वाचकांनी केवळ वाचक राहू नये, तर चिंतक व कृतीशील वाचक व्हावे, असे आम्हाला वाटते.

तुम्हाला हवे असलेले प्रश्न विचारा.

समोर येणाऱ्या समस्यांवर आपले विचार कळवा.

आपल्या परिसरातील सकारात्मक घडामोडी आमच्यापर्यंत पोहोचवा.

अन्यायाविरुद्ध, गैरप्रकारांविरुद्ध आपल्या आवाजात आवाज मिसळा.

कारण, शेवटी दैनिकाचा खरा उद्देश आहे — समाजात जागृती घडवणे आणि योग्यतेचा पुरस्कार करणे.

**नव्या संकल्पांची गरज**

आज महाराष्ट्र बदलतो आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे माहितीचा प्रवाह झपाट्याने वाढला आहे. मात्र या माहितीच्या महासागरात सत्य आणि अफवा यामध्ये फरक करणे कठीण झाले आहे. त्यामुळे, सत्यविषयक भान, योग्य समज आणि विवेकबुद्धी जपणे अत्यावश्यक आहे. यातच खऱ्या पत्रकारितेचे महत्त्व अधिक वाढते.

आम्ही आपले दैनिक म्हणून काही संकल्प करत आहोत:

सत्याशी प्रामाणिक राहू.

विविध विचारधारांना जागा देऊ.

नव्या पिढीला प्रेरणा देणाऱ्या कथा सांगू.

ग्रामीण भागातील आवाजांना मंच देऊ.

वाचकांच्या अभिप्रायाला सर्वोच्च मान देऊ. मात्र या प्रत्येक संकल्पात तुमचा सहभाग आवश्यक आहे. वर्धापन दिन म्हणजे फक्त भूतकाळाच्या यशाचा गौरव नव्हे, तर भविष्याच्या नव्या संकल्पांचा प्रारंभ आहे.

**बदलाची सुरुवात घरापासून**

आपण सर्वजण एक चांगले महाराष्ट्र घडवायचे स्वप्न पाहतो. पण या बदलाची सुरुवात आपल्या स्वतःपासून होते. आजच्या काळात सामाजिक माध्यमांवर अफवा पसरणे, द्वेष पसरवणे किंवा गप्पा करण्यापेक्षा, विचारपूर्वक वाचन करणे आणि विवेकाने मतप्रदर्शन करणे अधिक महत्त्वाचे झाले आहे.

आपण आपल्या घरातील लहान मुलांना वाचनाची गोडी लावली पाहिजे. दैनिकातल्या दर्जेदार बातम्या, मुलाखती, प्रेरणादायक लेख त्यांच्या पर्यंत पोहोचवले पाहिजेत. ही पिढीच उद्याचा महाराष्ट्र घडवणारी आहे.

**वर्धापन दिनाचा खरा अर्थ**

दैनिक स्वराज्यदूतचा हा दुसरा वर्धापन दिन म्हणजे आमच्यासाठी एक आत्मपरीक्षणाचा क्षण आहे. आम्ही काय साधले, काय साधायचे राहिले, याचा विचार करण्याचा दिवस आहे. वाचकांच्या अपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे कशा पूर्ण करता येतील, यासाठी नव्याने उर्मी घेण्याचा दिवस आहे.

या प्रवासात आमच्या चुका झाल्या असतील, तर त्या आम्ही स्वीकारतो आणि त्यातून शिकतो. तुमच्या सूचनांना, टीकेला आणि कौतुकाला आम्ही नेहमीच खुले आहोत. आजपासून पुढच्या वर्षीच्या वर्धापन दिनापर्यंत, एक पाऊल पुढे टाकण्याचा संकल्प आपण सगळे करू या.

**प्रिय वाचकहो,**

आपल्या सहकार्याशिवाय कोणतीही चांगली पत्रकारिता शक्य नाही. तुमच्या विश्वासावर आम्ही उभे आहोत, आणि त्या विश्वासाची गोडी आम्ही नेहमीच जपू.

आजच्या या दिवशी मी तुम्हाला एक आवाहन करतो.

चला, आपण सगळे मिळून एक सचोटीची, विवेकपूर्ण आणि प्रेरणादायी पत्रकारिता उभी करूया.

चला, एक नवा महाराष्ट्र घडवण्यासाठी वाचन, विचार आणि कृतीची नवचैतन्यपूर्ण चळवळ उभी करूया!

**आपला संपादक,**
**भास्कर जी देवरे**
**दैनिक स्वराज्यदूत**

## दोन शब्द वर्धापन दिनाच्या निमित्ताने

# वर्धापन दिनाचे आवाहन : आपण मिळून घडवूया आशेचा नवा प्रकाश

प्रिय वाचकबंधूंनो,

आज दैनिक स्वराज्यदूतच्या दुसऱ्या वर्धापन दिनी आपल्या सर्वांच्या समोर उभा राहताना हृदय कृतज्ञतेने भरून आले आहे. दोन वर्षांपूर्वी एक स्वप्न डोळ्यांत घेऊन आम्ही प्रवास सुरू केला. त्या स्वप्नाला दिशा दिली, जिवंत ठेवलं ते तुम्हा वाचकांच्या प्रेमाने, विश्वासाने.

पत्रकारितेचे खरे मूल्य सत्याचा ध्यास घेणे, समाजप्रबोधन करणे आणि नव्या आशेची पालवी फुलवणे हेच आम्ही आमचे व्रत मानले. पण हे व्रत फक्त आमचेच नाही, तर तुमचेही आहे. वाचक म्हणून तुमची जबाबदारी आहे योग्यतेला उचलून धरायची, प्रश्न विचारायचे, सकारात्मक बदलासाठी पुढे यायचं.

आज आपण सर्व मिळून एक नवीन संकल्प करूया

सत्याचा आग्रह धरूया,

अफवांच्या जाळ्यापासून स्वतःलाही वाचवूया आणि इतरांनाही,

विचारशील वाचन, चिंतन आणि कृतीची नवी परंपरा रुजवूया.

दैनिक स्वराज्यदूत हा केवळ एक वृत्तपत्र नाही, तर आपल्या जिव्हाळ्याचा एक विचारमंच आहे. तुमचे मत, तुमचे अनुभव, तुमची स्वप्ने यांनाच आम्ही आमच्या शब्दातून आवाज देणार आहोत.

ही दोन वर्षे फक्त एक सुरुवात आहे. पुढे अजून लांबचा आणि प्रेरणादायी प्रवास आहे. त्या प्रवासात तुम्ही आमच्या बरोबर असलात तर प्रत्येक संकट सहज झेलू आणि प्रत्येक यश अधिक अर्थपूर्ण होईल. चला तर मग, वर्धापन दिनानिमित्त एकत्र येऊ, नव्या उमेदीनं पुढे जाऊ आणि नव्या महाराष्ट्राच्या उज्ज्वल स्वप्नाला प्रत्यक्षात उतरवूया.

आपला

------------------------------------

**निवासी संपादक,**
**संतोष मोहिते**
**दैनिक स्वराज्यदूत**

# निघोज येथे पहलगाम दहशतवादि हल्ल्याचा तीव्र निषेध

## निघोज येथे अतिरेक्यांच्या प्रतिमेला जोडो मारो आंदोलन
## पाकिस्तानचे कागदी झेंडे पायदळी तुडवीत केला पाकीस्तानाचा निषेध

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------------



पारनेर तालुक्यातील निघोज परिसरातील पाकधार्जीने मुस्लिमांनी देशाशी गद्दारी करण्याचा प्रयत्न जरी केला तरी त्यांना कायमचा धडा शिकवू असा सज्जड इशारा निघोज येथील सर्वपक्षीय कार्यकर्ते, जनता यांनी जाहिरपणे दिला आहे. निघोज येथील एस.टी. बसस्थानक परिसरात पहलगाम येथील हिंदू बांधवांच्या हत्येचा निषेध करण्यात आला.तसेच या पाक धार्जीणे अतिरेक्यांच्या प्रतिमेला उपस्थित शेकडो लोकांनी जोडो मारो आंदोलन करण्यात आले. यावेळी शिवव्याख्याते प्रा ज्ञानेश्वर कवाद, शिवबा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिल शेटे, रुपेश ढवण, दिलीप ढवण, अस्लमभाई इनामदार, विलासराव हारदे, मेजर शेटे, माळवाडीचे सरपंच सोमनाथ भाकरे, संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष सचिन वराळ पाटील, भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे यांच्यासहित सर्वांनीच

जनतेच्या वतीने आपल्या भावना व्यक्त करीत पाकधार्जीने अतिरेक्यांचा निषेध केला. निघोज आणि परिसराची लोकसंख्या मोठी आहे. कोण येतय कोण जातय याचा तपास लागत नाही. मात्र परप्रांतीय मोठ्या प्रमाणात या ठिकाणी आहेत. यामध्ये मुस्लिम समाजाची संख्या मोठी आहे यासाठी पोलिस स्टेशन, ग्रामपंचायत यांनी दखल घेऊन त्यांचे आधार कार्ड घेऊन नोंद करण्याची गरज आहे. मध्यंतरी सणासुदीच्या माध्यमातून मशीदीमध्ये नमाज पडणाऱ्यांची संख्या मोठी होती यामध्ये परप्रांतीय मोठ्या संख्येने होते याला पायबंद घालण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. ती जबाबदारी निघोज येथील स्थानिक मुस्लिम समाजाची आहे. दूध डेअरी, बांधकाम व्यावसायिक व ईतर हॉटेल उद्योग या ठिकाणी काम करणारे परप्रांतीय कामगार यामध्ये कोण कोणत्या जातीचा हे पाहाण्यापेक्षा तो हिंदूस्थानी आहे का ? तो आपल्या भारत मातेवर प्रेम करणारा आहे की आपल्या देशात राहुण याच ठिकाणी खातो पितो, श्वास घेतो आणी प्रत्यक्षात पाकड्यांचे गुणगान गातो याची चौकशी संबंधित लोकांनी करण्याची गरज खऱ्या अर्थाने निर्माण झाली आहे. २६ / ११ चा मुंबई येथील दहशतवादी हल्ला, कारगिल हल्ला, तसेच वेळोवेळी काश्मीर सारख्या पृथ्वीवरील स्वर्ग मंदीरावर हल्ला करुण पाकधार्जीने मुस्लिमांनी आपल्यात राहून आपलाच देश खिळखिळा करण्याचे महापाप केले आहे. भारत- पाकीस्तान मॅचमध्ये भारत विजयी झाल्यानंतर फटाके वाजवून आनंद साजरा करण्यापेक्षा भारताला शिव्या देण्याचा प्रकार निघोज सारख्या सर्वाधिक हिंदू बांधव असणाऱ्या गावात होत आहे याला निघोज येथील मुस्लिम समाज बांधवांनी पायबंद घातला पाहिजे, औरंगजेब कबरीचा विषय मध्यंतरी निघाला होता त्यावेळी काही मुस्लिम समाजातील युवकांनी स्टेटस माध्यमातून औरंगजेबाचे कौतुक करीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका टिप्पणी केली हा प्रकार अतिशय निंदनीय होता. एवढे होऊनही हिंदू बांधव शांत बसले याचा अर्थ आम्ही नामर्द आहोत असा कुणी घेत असेल तर चुकीचा आहे. निघोज येथील यात्रा जत्रा उरुस व सर्व उत्सव आपण एकत्र साजरे करीत आहोत हा भाईचारा टिकला पाहिजे ही सर्वांचीच भावना आहे. मात्र मुस्लिम समाजातील चार दोन युवक अशा प्रकारे देशविघातक शक्तींना पाकड्या धार्जिणे मुस्लिम अतिरेक्याना प्रोत्साहन देण्याचे काम करीत आहेत त्यांना समज देण्याचे काम जर परिसरातील मुस्लिम ज्येष्ठ ग्रामस्थ यांच्या कडून होत नसेल तर अशा देशविघातक कृत्ये करणाऱ्या मुस्लिम युवकांना कायमचे वठणीवर आणण्यासाठी आमच्याकडे जालीम उपाय आहे तो जर केला तर तुम्हाला पाकिस्तानमध्ये जावे लागेल असा सज्जड इशारा उपस्थीतांनी आपल्या भावना व्यक्त करताना दिला आहे. पहलगाम येथील पाकधार्जीण्या मुस्लिमांनी केलेला हा एक भ्याड हल्ला आहे. धर्म काय,कुराण येतं आहे का हे सर्व विचारुण आपल्या हिंदू बांधवांच्या हत्या दिवसाढवळ्या केल्या आहेत. हे सर्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाकधार्जीने मुस्लिमांनी दिलेले हे उघड आव्हान आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत हा जागतिक महासत्ता होण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. देशाची अर्थव्यवस्था मजबूत आहे. देश महासत्ता होऊ नये देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी होण्यासाठी जर आपल्याच देशातील मुस्लिम समाज प्रयत्न करीत असतील तर त्यांना देशात राहाण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही. यासाठी मुस्लिम समाजाने अतिरकी कारवायांना पाठिंबा न देता भारत मातेवर प्रेम करुण अखंड हिंदुस्थानचा जाज्वल्य इतिहासाचा अभिमान ठेऊन काम करावे तरच हा भाईचारा कायम राहिल असा ठणठणीत ईशारा उपस्थीतांनी दिला आहे. शिवबा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिल शेटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सर्वपक्षीय कार्यकर्ते व जनतेचे संघटन करीत ही निषेध सभा घेऊन पाकधार्जीणे मुस्लिम अतिरेक्यांच्या प्रतिमेला जोडो मार आंदोलन मोठ्या प्रमाणात केल्याबद्दल शेटे व त्यांच्या सहकाऱ्यांना जनतेने धन्यवाद व्यक्त केले आहे.

---------------------------

**हा देश अटलजी आणी ए पी जे अब्दुल कलाम यांच्या विचारांच्या आणी तत्वाचा आहे. सर्वधर्मीय गुण्यागोविंदाने येथे नांदत आहेत मात्र काही पाकधार्जीने मुस्लीम युवकांनी धुडगूस घातला तर त्याची शिक्षा त्यांना लगेच मिळणार असा इशारा यावेळी देण्यात आला.**

------------------------------

**शिवबा संघटना व ग्रामस्थ यांनी आयोजित केलेल्या पहलगाम येथे हिंदूच्या हत्येच्या निषेधार्थ पाकधार्जीने मुस्लीम अतिरेक्यांच्या प्रतिमेला जोडो मारो आंदोलन करण्यात आले तसेच निषेध सभा घेण्यात आली यावेळी शिवबा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिल शेटे यांनी जोरदार भाषण करीत या घटनेचा निषेध केला.**

# पारनेर तालुका खरेदी विक्री संघाच्या पदाधिकारी निवडीत रस्सीखेच

## कोण होणार अध्यक्ष, उपाध्यक्ष; इच्छुकांची मोठी संख्या
## येत्या मंगळवारी पारनेर येथे निवड प्रक्रिया

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------




सहकारी दृष्ट्या नव्हे तर राजकीय दृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेली पारनेर तालुका खरेदी विक्री संघाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा ऍड. बाबासाहेब खिलारी व उपाध्यक्ष पदाचा राजीनामा गंगाधर रोहकले यांनी वरिष्ठांच्या आदेशाने दिल्यानंतर आता नव्या पदाधिकारी नेमणूक येत्या मंगळवारी होणार आहे. ही निवडणूक प्रक्रिया प्रशासकीय पातळीवरून पार पडणार आहे. राजकीय दृष्ट्या महत्त्वपूर्ण समजली जाणारी ही सहकारी संस्थेमध्ये आता अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी रस्सीखेच सुरू आहे अनेक संचालक हे अध्यक्ष व उपाध्यक्ष होण्यासाठी इच्छुक असल्याचे समजते मा. खासदार सुजय विखे व आमदार काशिनाथ दाते, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, पारनेर भाजपचे अध्यक्ष राहुल पाटील शिंदे, भाजप नेते विश्वनाथ कोरडे यांच्या निर्णयाने अध्यक्ष उपाध्यक्ष निवडले जाणार असले तरी संचालक मंडळ मध्ये इच्छुकांची संख्या मोठी आहे. भाजप व राष्ट्रवादी अजित पवार गटाचे या खरेदी विक्री संघावर एक हाती वर्चस्व आहे. त्यामुळेच वरिष्ठ राजकीय नेते आता इच्छुकांना कसा न्याय देतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. पारनेर तालुका सहकारी खरेदी विक्री संघ मर्यादित, पारनेर, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांच्या नोंदणीकृत उपविधीतील तरतुदींनुसार मा. चेअरमन आणि मा. व्हा. चेअरमन या पदांच्या निवडीसाठी विशेष संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यात आले आहे. मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहिल्यानगर यांच्या आदेशान्वये (जा.क्र.२२६४/२०२५, दि.१५/०४/२०२५) श्री. विकास जाधव, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पारनेर यांची अध्यासी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा दि. २९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पारनेर यांच्या कार्यालयात, चेडे बिल्डींग, कॉलेज रोड, पारनेर येथे होणार आहे.या सभेत संचालक मंडळामधून चेअरमन आणि व्हा. चेअरमन या पदाधिकाऱ्यांची निवड केली जाणार आहे. सर्व संचालकांना सभेस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि नियमानुसार व्हावी यासाठी प्रशासकीय पातळीवरून प्रयत्न सुरू आहेत.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

# सुरत बायपास वर नागरिकांना लुटणाऱ्या टोळीला धुळे एलसीबीने केले जेरबंद!

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------




टोकदार हत्याराचा धाक दाखवून मध्यरात्रीच्या सुमारास तरुणाची लूट करणाऱ्या एका टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पर्दाफाश केला. टोळीतील दोघांना जेरबंद केले. त्यांच्याकडून दुचाकीसह मोबाईल व रोख रक्कम असा २२ हजार ८७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. फरार झालेल्या अनोळखी दोघांचा पोलीस शोध घेत आहेत. अजय आनंदा मोरे (वय २५, रा. जुने भदाणे ता. धुळे) हा तरुण सुरत बायपास रस्त्यावरुन १९ एप्रिल रोजी मध्यरात्रीच्या सुमारास जात असताना दोन दुचाकीने चार जण पाठीमागून आले. त्यांनी तरुणाला लिफ्ट देत हॉटेल चंद्रदिप समोरील रस्त्यावर आणले. अजय याच्याकडील रोख रक्कम आणि मोबाईल असा ऐवज घेवून पोबारा केला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर तपास सुरु असतानाच चैतन्य जगदीश पाटील (वय २४, रा. रेणुका नगरच्या पाठीमागे, सेक्टर नंबर १, चितोड रोड, धुळे) आणि विशाल उर्फ कल्लू मधुकर भामरे (वय ३२, रा. सुरक्षा पोलीस कॉलनी, आश्रम शाळेच्या मागे, चितोड रोड धुळे) या दोघांना चितोड गावाजवळील शांतुशा नगरमधून ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखविताच दोघांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्याकडून १० हजाराचा मोबाईल, २ हजार ८७० रुपये रोख आणि गुन्ह्यात वापरलेली एमएच १८ बीडब्ल्यू ५८२९ क्रमांकाची १० हजाराची दुचाकी असा एकूण २२ हजार ८७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या टोळीतील अन्य दोन अनोळखी तरुण फरार झाले असल्याने पोलीस त्यांच्या मागावर आहेत. कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार व त्यांच्या पथकातील सहायक पोलीस उपनिरीक्षक संजय पाटील, सतिष जाधव, पोलीस हेड कॉन्स्टेबल संदिप पाटील, मायूस सोनवणे, संतोष हिरे, सुरेश भालेराव, प्रकाश सोनार, नितीन दिवसे, किशोर पाटील, योगेश जगताप यांनी कारवाई केली.

# दहिवेल पिंपळनेर रोडवर मजुरांच्या रिक्षाला एसटी बसची जोरदार धडक दहा ते बारा महिला गंभीर जखमी

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------



पिंपळनेर दहिवेल पिंपळनेर रोडवर चिंचपाडा फाट्याच्या पुढे चिंचपाडा येथे कांदा काढण्यासाठी गेलेल्या महिला मजुरांच्या रिक्षाला MH ४१L ३५५१ ला मागून येणाऱ्या नवापूर नाशिक एसटी बस क्रमांक MH १४ BT १८३० ने मागून जोरदार धडक दिली या रिक्षामध्ये चिंचपाडा येथे कांदा काढणीसाठी धनगाई येथील मजूर महिला ठीक सायंकाळी साडेपाच वाजता काम आटोपून धनाईकडे जात रिक्षाने जात होत्या त्याच वेळेला नवापूर कडून नाशिक कडे जाणाऱ्या एसटी बसने रिक्षाला मागून धडक दिल्याने रिक्षा रस्त्याच्या बाजूला फेकली गेली व मजूर महिला रस्त्यावर फेकल्या गेल्या या रिक्षामध्ये एक पुरुष ड्रायव्हर व २१ मजुर महिला होत्या. यापैकी आठ ते दहा महिलांची तब्येत गंभीर असून त्यांना तात्काळ दहिवेल येथे १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेने पाठवण्यात आले तिथुन गंभीर जखमी सहा मजुर महिलांना धुळे येथे पाठवण्यात आले. यावेळी मैदाने व चिंचपाडा येथील ग्रामस्थांनी सहकार्य करून सर्व महिलांना १०८ रुणवाहिकेमध्ये रवाना केले.

# धुळे जिल्ह्यात फिरणार विषेश गौणखनिज पथकाची नेणमणूक

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------



पिंपळनेर मा. जिल्हाधिकारी, धुळे यांनी दिनांक २५ रोजी दुपारी ४.०० वाजता दुरचित्रवाणीव्दारे झालेल्या बैठकीमध्ये विषेश गौणखनिज पथकाची नेणमणूक करण्याबाबत निर्दे श देण्यात आलेले आहेत. त्यानुसार या कार्यालयाकडील दिनांक २५ ते दि. २८ या कालावधीसाठी तहसिल कार्यालयातील नायब तहसिलदार यांची पथक प्रमुख म्हणून विशेष गौणखनिज पथकाची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्या प्रमाणे पथकांनी आज दिनांक २६ रोजी सकाळी ४.४८ वा. मौजे दातर्ती पांझरा नदीपात्रात अवैध गौणखनिज (वाळू) वाहतुक करणारे ट्रॅक्टर तहसिल कार्यालय साक्री येथे जमा करण्यात आलेले आहे. तसेच दिनांक २६ रोजी वाजदरे शिवारात व बळसाणे शिवारात अवैध गौणखनिज (वाळू) वाहतुक करणारे ०२ ट्रॅक्टर तहसिल कार्यालय, साक्री येथे जमा करण्यात आलेले आहेत. असे एकूण ०३ अवैध गौणखनिज वाहतुक करणारे वाहने जप्त करण्यात आलेली आहेत. तरी तमाम नागरिकांना आवाहन करण्यात येते की, साक्री तालुक्यात अवैध गौणखनिज वाहतुक अथवा उत्खनन होत असल्याचे आढळून आल्यास तात्काळ इकडील कार्यालयास कळविण्यात यावे, याचाबत तात्काळ या कार्यालयाकडून कारवाई करण्यात येईल.

(साहेबराव सोनवणे)
तहसिलदार, साक्री

# श्री विशाल नरवाडे मुख्य कार्यकारी अधिकारी जि प धुळे यांना भेट घेण्यासाठी लावलेल्या जाचक अटी

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

भारतीय लोकशाही मध्ये शासकीय अधिकारी/ कर्मचारी हे लोकसेवक असून सर्वसामान्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्या सोडवण्याचा प्रयत्नकरणे अपेक्षित आहे. जनता सर्वसामान्य नागरिक हा राजा होय मात्र श्री विशाल नरवाडे मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. धुळे यांनी लोकसेवक या संज्ञाला तिलांजली दिली आहे . आपण लोकसेवक नसून राजा आहोत अशा भ्रमात ते वागत असतात त्यांची कार्यशैली अत्यंत वादातील, हुकुमशाही मनमानी पद्धतीचे आहे.

१) जिल्हा परिषद कार्यालयात जिल्हा परिषद कार्यालयात जिल्हाभरातून अडीअडचणी/ भ्रष्टाचाराबाबत ग्रहाणे, समस्या घेऊन येणाऱ्या सर्व सामान्य नागरिकांना ते भेटतच नाहीत.

२) अभ्यागतांना आठवड्याच्या सोमवारी व गुरुवारी केवळ २ दिवसच तेही दुपारी ३:०० वाजेनंतरच असा त्यांचा अलिखित नियम आहे

३) अभ्यागतांना सोमवार व गुरुवार व्यतिरिक्त इतर दिवस का भेटू नये ? असं सर्वसामान्य माणसाचा सवाल आहे.

४) अभ्यागतांना आठवड्याच्या सोमवार व गुरुवार ठरलेले भेटीचे वेळेस शासकीय दौरा, कार्यक्रम ,V.C मीटिंग असल्यानतर जनतेने काय करावे ?

५) लोकशाही व्यवस्थेप्रमाणे सर्वसामान्य जनता वरिष्ठअधिकाऱ्यांना आपल्यावरील अन्याय बाबत कार्यालयीन वेळेत केव्हाही भेटू शकतो

६) अभ्यागतांना भेटण्याकरिता केवळ सोमवार व गुरुवारी दुपारी ३:०० वाजता भेटता येईल याबाबत आपले मात्र आदेश आहेत का?

७) मानवी अधिकार्याचे हणन करण्याचा अधिकार कोणी दिला?

तरी वरील मुद्देनिहाय सामाजिक कार्यकर्ते श्री कैलास मोरे यांनी श्री प्रविण गेडाम विभागीय आयुक्त नाशिक याच्या कडे लेखी तक्रार करून तात्काळ चौकशी होऊन श्री विशाल नरवाडे मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. धुळे यांच्या मनमानी कार्यपद्धतीबाबत व सर्वसामान्य जनतेस त्यांच्या अडीअडचणी सोडवण्याकरिता भेटण्यास अटी शर्ती चे बंधन टाकून मानव अधिकाऱ्यांचे उल्लंघन होत असल्यास बाबत तक्रार केली आहे .

# पाकिस्तानी नागरिकांवरून महायुती सरकारमध्ये समन्वयाचा आभाव? शिंदे-फडणवीसांची परस्परविरोधी वक्तव्ये; नेमकं काय म्हणाले?

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------------



पाकिस्तानी नागरिकांवरून राज्यातील महायुतीच्या सरकारमध्ये समन्वयाचा आभाव पाहायला मिळत आहे. महाराष्ट्रातील १०७ पाकिस्तानी नागरिक बेपत्ता असल्याचं वक्तव्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. तर, राज्यात आलेल्या पाकिस्तानी नागरिकांपैकी एकही जण बेपत्ता नाही असं वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. तसेच सर्व पाकिस्तानी आज संध्याकाळी किंवा उद्या सकाळपर्यंत राज्य सोडून निघन जातील, असंही फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे. एकनाथ शिंदे म्हणाले, “केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं आहे की पाकिस्तानी नागरिकांनी आमचा देश सोडून निघून जावं. पाकिस्तानी नागरिकांनो चालते व्हा असं फर्मान त्यांनी काढलं आहे. हे प्रत्येक भारतीयांच्या मनातलं फर्मान आहे. ही तुमच्या आमच्या मनातली इच्छा आहे. महाराष्ट्रातही काही पाकिस्तानी नागरिक होते. त्यापैकी १०७ पाकिस्तानी नागरिक कुठेतरी बेपत्ता झाल्याची माहिती मिळाली आहे. मात्र माझं त्यांना सांगणं आहे की तुम्ही जिथे कुठे असाल तिथून चालते व्हा. पाकिस्तानी नागरिकांनी आमचा देश सोडून निघून जावं, अन्यथा पोलीस तुम्हाला शोधतील आणि जागेवरच ठोकतील. कारण लोकांच्या मनात चीड आणणारी घटना (पहलगामधील दहशतवादी हल्ला) घडली आहे.

**एकही पाकिस्तानी नागरिक हरवलेला नाही : फडणवीस**

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांचा दावा खोडून काढला आहे. फडणवीस यांनी काही वेळापूर्वी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी काही वार्ताहरांनी फडणवीस यांना एकनाथ शिंदे यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया विचारली असता फडणवीस म्हणाले, “१०७ नागरिक हरवल्याचं बोललं जात आहे. मात्र, एकही पाकिस्तानी नागरिक हरवलेला नाही.”

**“सर्व पाकिस्तानी नागरिकांची परत पाठवण्याची तयारी झालीय”**

मुख्यमंत्री म्हणाले, “जेवढे पाकिस्तानी नागरिक महाराष्ट्रात आले होते ते सगळे सापडले आहेत आणि सगळे आता देशाबाहेर चालले आहेत. या सर्वांची स्वगृही परत पाठवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. एकही पाकिस्तानी नागरिक आपल्या राज्यात राहणार नाही. माझा अंदाज आहे की आज संध्याकाळी किंवा उद्या सकाळपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होऊन जाईल. त्यानंतर एकही पाकिस्तानी आपल्याला दिसणार नाही.”

# देशाची आरोग्य व्यवस्था जगात सर्वात सक्षम आणि मोठी – जे.पी.नड्डा

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



जगात आपल्या देशाची आरोग्य व्यवस्था सर्वात मोठी असून या आरोग्यव्यवस्थेने प्रगती केली आहे. लसीकरण, महिलांचे आरोग्य, बाल आरोग्य तसेच इतर वैद्यकीय सेवा सुविधांमध्ये आपला देश आघाडीवर असून आपल्या देशात वैद्यकीय पर्यटनाच्या माध्यमातून नवे क्षेत्र खुले झाले आहे, असे प्रतिपादन केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी आज येथे केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान, अंतर्गत आर. के. दमानी मेडिकल कॉलेज, श्री रामचंद्र इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस या महाविद्यालयाच्या कौशलम् – द स्किल लॅबचे उद्घाटन जे.पी. नड्डा यांच्या हस्ते करण्यात आले. राज्यसभेचे खासदार डॉ. भागवत कराड, उद्योजक कृषी कुमार बागला, उमेश दाशरथी, डॉ.विदेश केसरी,डॉ. सतीश कुलकर्णी, महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. स्वाती शिरेडकर यांच्यासह वैद्यकीय महाविद्यालयाच्या विविध विभाग प्रमुख तसेच विद्यार्थी उपस्थित होते. नड्डा म्हणाले की, डॉ. हेडगेवार यांच्या सेवेचा वारसा या रुग्णालयाच्या माध्यमातून पुढे चालवला जात आहे. आणि ही संस्था आरोग्य सेवेसाठी समर्पित आहे. आरोग्य सेवेचे शाश्वत उद्दिष्ट समोर ठेवून मिशन मोडवर या रुग्णालयाने समाजाची गोरगरीब रुग्णांची सेवा केली आहे. या सेवेचे विस्तारित स्वरूप आर के दमानिया रुग्णालय आणि महाविद्यालयाच्या माध्यमातून केले जाईल. बदलत्या आरोग्य सेवेतील तंत्रज्ञानाचा उपयोग सर्वसामान्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी व्हावा. यासाठी रुग्णालय आणि महाविद्यालयातील प्रत्येक डॉक्टर आणि सेवा च्या माध्यमातून ही संधी उपलब्ध करून दिली आहे. आरोग्य क्षेत्रामधील भारताची प्रगती ही इतर देशांना मार्गदर्शक आहे. लोकसंख्या व भौगोलिक विविधता असूनही आरोग्य व्यवस्था सक्षम आणि अग्रेसर असल्याचे, प्रतिपादन मंत्री नड्डा यांनी केले. जागतिक पातळीवर जास्तीत जास्त डॉक्टर विविध विषयातील तज्ज्ञ निर्माण करण्याची संधी भारताने निर्माण केली असून या देशातील वैद्यकीय सेवा देणारे डॉक्टर परदेशातही आपले विशेष स्थान निर्माण करून आहेत. नवीन विद्यार्थ्यांनी वैद्यकीय सेवा ही एक संधी समजून समाजसेवा करण्याचे ध्येय ठरवावे, असे आवाहन नड्डा यांनी विद्यार्थ्यांना केले.

# पहलगाममध्ये अतिरेक्यांना स्थानिकांनी केली मदत

विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------



जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. नाव आणि धर्म विचारुन हत्या करण्यात आली. या अतिरेकी हल्ल्यासाठी स्थानिकांनी अतिरेक्यांना मदत केली. अतिरेक्यांच्या हल्ल्यात २५ हिंदू पर्यटक ठार झाले. याव्यतिरिक्त एक स्थानिक पर्यटकांना वाचवण्याच्या प्रयत्नात ठार झाला. सुरक्षा पथकाने अतिरेक्यांच्या मदतनिसांना शोधण्यासाठी १५०० पेक्षा जास्त नागरिकांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली. या चौकशीतून अतिरेक्यांना मदत करणाऱ्यांना पोलिसांनी शोधले आहे. अतिरेक्यांना १५ जणांनी मदत केल्याचा संशय व्यक्त होत आहे. या प्रकरणात पोलीस सखोल तपास करत आहेत. दोषींवर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. याआधी सुरक्षा पथकाने दहा स्थानिक अतिरेक्यांची घरे उद्ध्वस्त केली. यात लष्कर – ए – तोयबाचा आदिल हुसेन ठोकर, झाकीर अहमद गनई, अमीर अहमद दार आणि आसिफ शेख, शाहिद अहमद कुट्टे, अहसान उल हक अमीर, जैश-ए-मोहम्मदचा अमीर नझीर वाणी, जमील अहमद शेर गोजरी, द रेझिस्टन्स फ्रंटचा अदनान सफी दार आणि फारूक अहमद तेडवा यांचा समावेश आहे. पोलिसांनी अतिरेकी हल्ला प्रकरणात एकूण चार रेखाचित्रे प्रसिद्ध केली आहेत. या अतिरेक्यांचा शोध सुरू आहे. अतिरेकी स्थानिकांच्या सहकार्याने हल्ल्याच्या ठिकाणी पोहोचले. स्थानिकांची मदत होती त्यामुळे अतिरेकी प्रत्यक्ष हल्ला सुरू करेपर्यंत शस्त्र सुरक्षित ठिकाणी लपवून ठेवण्यात यशस्वी झाले होते. या प्रकरणात अतिरेक्यांच्या मदत केल्याचे सिद्ध झाल्यास कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाणार आहे.

स्वराज्यदूत दैनिकाच्या
वर्धापन दिनानिमित्त
तमाम वाचक हितचिंतक
बंधू बघिनी यांना हार्दिक शुभेच्छा

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore






म्हसदी येथील ग्रामपुरोहित समाजसेवक श्री दीपंकर दीक्षित (गणू महाराज) यांना समाजसेवक भारत भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल पत्रकार श्री संजय कालेश्वर बच्छाव, दैनिक स्वराज्यदूत धुळे जिल्हा प्रतिनिधी यांनी त्यांच्या ज्योतिष कार्यालयाला भेट देऊन शाल श्रीफळ देऊन सत्कार केला.











# काय होतास तू काय झालास तू.....

(श्री वासुदेव दयाराम पाटील प्र. केंद्रप्रमुख पोशेरा. हे दिनांक ३१ |०५|२०२५ (३५ वर्ष ३ महिने ५ दिवस पूर्ण करून सेवानिवृत्त होत आहेत त्या निमित्ताने त्यांच्या जीवन प्रवास त्यांच्याच शब्दात.)

मी वासुदेव दयाराम पाटील हे एक सर्वसामान्य कुटुंबातील एक साधारण विद्यार्थी. झे आई-वडील असाक्षर होते परंतु साक्षरात महान होते म्हणून मला त्यांनी घडवलं आज हा दिवस त्यांच्यामुळे मला पाहायला मिळाला. आम्ही दोन भाऊ चार बहिणी असं आमचं कुटुंबातील सदस्य गरीब परिस्थिती मेहनतीने कष्टाने प्रामाणिकपणे काम करायचं ही माझ्या आई-वडिलांची बहीण भावाची मला शिकवण होती.

परिस्थिती नाजूक होती परंतु मला माझा आजपर्यंतच्या आयुष्यात तुम्हाला आई-वडिलांना बहिण भाऊ यांनी कधी काहीच कमी पडू दिले नाही. नेहमी मार्गदर्शन आई-वडिलांचे बहीण भावाचे सांगणं असायचं व्यवस्थित अभ्यास कर आणि पुढे जा एवढेच सांगणे असायचे. पुढे सात लाभली माझ्या वर्ग मित्रांचे सहकारी बंधूंची त्यामुळे चांगली साथ लाभली माझ्या गुरुजनांची त्यांनी मला चांगले घडविले. चांगली सात लागली माझ्या पत्नीची स्वतः शीवन काम करून चांगले संस्कार माझ्या मुलांवर केलेत मला पत्नीचे सांगणे एकच असायचं तुम्ही शाळेतली मुलं चांगली सांभाळा मी घरची मुलं चांगली सांभाळीन चांगले संस्कार आमचे धडे माझ्या दोन्ही



मुलांवर दिले चांगल्या त्यांच्या शिक्षणात पत्नीने साथ दिली. दोन्ही मुले इंजिनियर आहेत मोठा मुलगा निलेश बीई कम्प्युटर इंजिनीयर आहे तो पुण्यात एक नामांकित कंपनीमध्ये चांगल्या पॅकेजवर सध्या काम करत आहे. लहान मुलगा सुदर्शन उर्फ भूषण हा मेकॅनिकल इंजिनियर आहे तो सिन्नर एमआयडीसी येथे शिंदे पळसे कंपनीत सुपरवायझर म्हणून काम करत आहे परंतु टूर ट्रॅव्हल्स ची आवड असल्याने त्याने स्वतःचा टूर्स ट्रॅव्हलचा व्यवसाय सुरू केला आहे. त्यानंतर आई-वडिलांचे बहीण भावाचे पुण्याने दोन्ही मुलं विवाहित आहेत. मोठी सून देवयानी एमबीएचे शिक्षण झाले असून पुणे येथे नामांकित कंपनी मध्ये नोकरी करत आहे.लहान सून शुभांगी चे इंजिनिअरिंगचे शिक्षण झाले असून सुरत येथील कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून वर्क फ्रॉम होम काम करत आहे. मला एक नातबाई आहे तिचे नाव प्रियांशी उर्फ माऊ शिवण्या ती बाबा असं गोड बोलते (एक नातू आता येणार आहे) आता रिटायर नंतर मी माझ्या गोड परिवारात जीवन जगेल सर्वांचे मनापासून धन्यवाद जय हिंद जय महाराष्ट्र.